राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- २२९ / २०२३ / कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| शिवाजी गुंडू शिंदे | मुख्यालय सहाय्यक,<br>उप अधीक्षक भूमी अभिलेख<br>कार्यालय शिरोळ, जिकोल्हापूर. | उप अधीक्षक भूमी अभिलेख<br>कार्यालय शिरोळ, जिकोल्हापूर.,<br>उप अधीक्षक भूमी अभिलेख<br>कार्यालय शिरोळ,जिकोल्हापूर. |

( सुनावणी दिनांक - १८ /०२ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. ०४.०१.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.२०/०४/२०२२ च्या माहिती अर्जात दि ०८.०४.२०२२ रोजी अर्जदाराने दिलेल्या तक्रार अर्जासंबंधीत आपल्या कार्यालयाने कोणती कार्यवाही केली, त्याची माहिती मागितलेली आहे.

उपलब्ध अभिलेखावरुन, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि.९/१/२०२३ च्या निकालानुसार अपिलार्थीस दि.१३/०१/२०२३ रोजी माहिती दिल्याचे दिसून येते. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

सदरचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. २२९ / २०२३ / कोल्हापूर/ 7328/2025

दिनांक - 5/3/2025